ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षक – शिक्षणातील अभ्यासक्रमातील सुधारणा

**प्रा. डॉ. सोपान गोविंद खाडे.**
वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन ,इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली.
मो. नं. 9421219867

## प्रास्ताविक

शिक्षणामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकास होतो. शिक्षणामुळे व्यक्तीविकास होतो. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन. शिक्षणाच्या अशा अनेक व्याख्या आहेत. शिक्षणातून जर खराखुरा नवसमाज निर्माण करावयाचा असेल तर त्या दृष्टीने ठोस पावले उचलायला हवीत याची शिक्षण तन्ज्ञांना जाणीव हवी. भारत महासत्ता बनवायचे स्वप्न साकार करावयाचे आहे. त्यासाठी त्या समाजाची तयारी (पाया)शालेय स्तरावर होणे आवश्यक, शिक्षणातून नेमके काय जायला हवे, शिक्षणामुळे नेमके कोणते बदल अपेक्षित आहेत त्यासाठी कोणती उपाययोजना आमलात आणायला हवी यावर साधकबाधक चर्चा होत आहे. नवनवीन शिक्षण आयोग आपली शैक्षणिक धोरणे जाहीर करतात त्याप्रमाणे शिक्षणात बदल घडतात. पण प्रत्यक्ष यश मात्र खूपच कमी हाती येत आहे. शैक्षणिक धोरणातून काही अपेक्षा व्यक्त केल्या जातात. आपली राज्यव्यवस्था, लोकशाही प्रधानराज्यव्यवस्था आहे. आशा सुदृढ लोकशाहीसाठी सुजाण नागरिकांची आवश्यकता असते. शिक्षणातून असे सुजाण नागरिक निर्माण व्हावेत व लोकशाही राज्यव्यवस्था अखंड राहवी. भारत विविधतेने नटलेला देश आहे. भाषा–जाती –धर्म–पंथ आशा अनेकांनी बहरलेल्या या देशात राष्ट्रीय एकात्मता आणि सर्व धर्माप्रत आदर प्रत्येकाच्या मनात असायला हवा. समानतेसाठी शिक्षण हा ही एक महत्वाचा विचार आहे. स्त्री–पुरूष,गरीब–श्रीमंत, कनिष्ठ–वरिष्ठ असा कोणताही भेदभाव न मानणारा समाज शिक्षणातून निर्माण व्हावा. भारतीय संस्कृतीत प्राचीन आहे. त्याच प्रमाणे ती संपन्नही आहे. हया प्राचीन व संपन्न संस्कृतीचा वारसा आपण जपला पाहिजे. ते ही शिक्षण विद्यार्थांना दयायला हवे. भारताची लोकसंख्या सव्वाशेकोटीच्या जवळ आहे. म्हणून मनुष्य बळाचा योग्य वापर करून घ्यायला हवा त्यासाठी प्रत्येकांच्या क्षमता,आवड,गरजेचा विचार करून शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणून व्यावसायिक शिक्षण गरजेचे आहे, शिक्षणात समाजाचा सहभाग गरजेचा आहे.

## शैक्षणिक तंत्रज्ञान

सध्याचे युग विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाचे आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण–शिक्षणामध्येही महत्वाचा आहे. आज समाजात पालक जागृत झालेले आढळतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागात पोहचल्या आहेत. खाजगी शिक्षण संस्था शासकीय शाळांपेक्षा गुणवत्तेच्या बाबतीत श्रेष्ठ ठरत आहेत. अशा वेळी पाल्य कोणत्या शिक्षण संस्थेत पाठवयाचे ते ठरवितात. तेव्हा तेथे असणा–या भौतिक सुविधा,अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सेमी इंग्रजीचे वर्ग, डिजिटल क्लासरूम, ई–मेल शिक्षण प्रणाली इत्यादी सुविधांचा विचार करतात. या सुविधांचा योग्य वापर करणारे शिक्षक तेथे उपलब्ध आवश्यक आहे. या दृष्टीने प्रशिक्षण कालावधीत शिक्षण–प्रशिक्षणार्थांना वरील माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यासाठी केवळ डी.टी.ई.,बी.एड.,बी.पी.एड मध्ये हा विषय सुरू करून चालणार नाही तर त्याचे प्रात्यक्षिक ज्ञान ही मिळाले पाहिजे.

उदयाचा शिक्षक हा माहिती तंत्रज्ञानामध्ये स्वतः तज्ञ असेल. तो विद्यार्थांचा प्रवेशापासून त्याच्या मूल्यांकन पर्यंतच्या नोंदी स्वतः करेल. अध्ययन–अध्यापनात आधुनिक ज्ञानाचा,तंत्रज्ञानाचा वापर

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

करेल. आपल्या विषया संबंधी नवीन ज्ञान,माहिती,बदल यांची दखल त्याला स्वतः घेता येईल असा सक्षम शिक्षक तयार करणारा शिक्षण –प्रशिक्षणांमध्ये तयार करणे आवश्यक आहे.

**अध्ययन**

अध्यपान प्रकिया – अध्ययन –अध्यापन क्रिया अलग नाहीत त्या परस्पलावलंबी आहेत. सामान्यता अध्यापनाचा हेतू अध्ययन घडवून आणणे असा आहे. म्हणजे अध्ययन हे अध्यापनाचे फलीत आहे असे मानले जाते. अध्ययन व अध्यापन या दोन्ही प्रक्रिया परिणामकारक बनल्या की शिक्षण परिणामकारक होईल यात संदेह नाही. शैक्षणिक क्षेत्रात अलीकडे अध्यापन प्रक्रिया परिणामकारक कशी करता येईल यावर जागतिक पातळीवर संशोधन सुरू आहे.

अध्यापनात नवनवीन अध्यापन पध्दतींचा समावेश, विविध प्रतिमानाचा समावेश, विद्यार्थांच्या मनावर आशय ठसवीण्यासाठी माहिती–तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल, सेमी इंग्रजी, इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये अध्ययन–अध्यापन कसे करावे कोणते बदल पारंपारिक शाळां–अधुनिक शाळांमध्ये आहे त्यानुसार अध्यापनात कसे बदल करावे बदल लागतील या सर्वांचा समावेश आजच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमांत होणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात क्रांती झाली आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव शिक्षण क्षेत्रावरही आहे या तंत्रज्ञानाचा वापर प्रत्यक्ष अध्यापनात प्रभावी कसा करता येईल याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. आजच्या शिक्षकाला ही साधने हाताळावयाची व्ही. सी.आर.,टी.व्ही,एल.सी.डी. ,कॅमेरा इत्यादी साधने वापरावयाची कशी, त्यांचा अध्यापनात वापर करण्यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. इंटरनेट वापर कसा करावयाचा, विद्यार्थांना ज्ञानसंपन्न बनविण्यासाठी ही संधी वरदान ठरत आहे. पण या साधनांचा वापर कसा करावा असे प्रशिक्षित शिक्षक नाहीत. यासाठी प्रशिक्षण कालावधीत असे पाठ घेण्याचे स्वतंत्र प्रात्यक्षिक असावे. अभ्यासक्रमात त्याला प्रथम स्थान दयावे.

**संशोधन वृत्तीचा विकास**

आज शिक्षण क्षेत्रात विविध समस्या उभा राहिल्या आहेत. भारत आणि इंडिया यांचे शिक्षण वेगवेगळे असावे का येथून शासनाची बदलती धोरणे, समाजात होणारे बदल,अभ्यासक्रमात होणारे बदल,जागतिक पातळीवर होणारे बदल,विद्यार्थांच्या वाढत्या अपेक्षा, शालेय किमान भैतिक सुविधा विद्यार्थ्यांचा प्रवेश,उपस्थिति, वर्तन यांच्या अपेक्षा शिक्षकावर लादली जाणारी कामे व बंधन, सामाजिक समस्या व त्याचा शिक्षणावर होणारा परिणाम इत्यादी अनेक समस्या आपल्या समोर उभ्या आहेत. त्या सोडविण्यासाठी आपल्याला शिक्षकांचे सहाय्य अपेक्षित आहे. त्यासाठी शिक्षक हा संशोधक असला पाहिजे. त्याला शिक्षणांची जाण हवी आहे. तरच हया समस्या सोडविण्यासाठी शिक्षक संशोधन वृत्ती याकडे लक्ष ठेवले हया संशोधन वृत्तीचा विकास होयण्यासाठी अशा स्वरूपाच्या अभ्यासक्रमात सुधारणा अपेक्षित आहेत.

**विषयज्ञान**

आजचा पदवी किंवा पदवीत्तर विद्यार्थी त्याच्या पदवीच्या विषयात तज्ञ असावा असे गृहीत धरलेले असते. पण सद्यः स्थिती मात्र निराशजनक आहे. याशिवाय प्रशिक्षणार्थीला दुसरी अध्यापन पध्दती निवडावी लागते तो विषय विद्यार्थ्यांने एफ.वाय/एस.वाय या स्तरावर अभ्यासलेला असतो तर विज्ञान किंवा गणित अध्यापन पध्दतीच्या विद्यार्थ्यांना दोन्ही अध्यापान पध्दती दयाव्या लागतात. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांने 12 वी मध्ये सोडलेला असते तर गणिताच्या विद्यार्थ्यांने एफ.वाय.बी.एस.सी .ला तो विषय

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

सोडलेला असतो. त्यामुळे विषयज्ञाना मध्ये विद्यार्थी अप्रगत आसतात असे विद्यार्थी सेवाकालात हया विषयाचे अध्यापन करतात त्यामुळे प्रशिक्षण काळात किमान विषयज्ञान देण्याची व्यवस्था पाहिजे. या दृष्टीने अभ्यासक्रमात सुधारणा घडवून आणता येईल.

**व्यक्तिमत्व विकास पैलूची जडण –घडण**

शाळेत असणारे विद्यार्थी हे भविष्य काळातील देशाचे नागरिक आहेत त्यांची जडण –घडण वर्गावर्गात होत असते. यासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास याच स्तरावर होणे आवश्यक आहे. मानसशास्त्रीय व तात्विक दृष्टीकोनातुन त्यांच्या विविध सुप्त शक्तींचा विकास होण्यासाठी अभ्यासक्रमात असे घटक व प्रत्याक्षिक कार्य देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर पैलू पाडण्याचे कार्य शिक्षक करतात. म्हणून प्रशिक्षणार्थी शिक्षकांना असे शिक्षण देणे आवश्यक आहे.

**मूल्यशिक्षण व श्रम संस्कार**

प्रशिक्षण काळात शिक्षकाला मूल्यशिक्षणाचे महत्व समजावून देणे विविध मुल्य विद्यार्थ्यांच्या कशाप्रकार रूजविता येतील त्यासाठी कोणते उपक्रम राबविता येईल याचे प्रशिक्षण देता येईल त्याच प्रमाणे श्रम संस्कार ही महत्वाचे आहेत. आज विद्यार्थी श्रमदान करणे, कष्ट करणे यापासून दूर जात आहे. पण हयाच विद्यार्थांना श्रमाचे महत्व त्याचा देशासाठी उपयोग हे समजावून दिले तर विद्यार्थ्याला श्रम करताना कमीपणा वाटणे ,लाज वाटणे हया गोष्टी घडणार नाहीत कोणतेही श्रम हे श्रेष्ठ असते हे पटल्यामूळे विद्यार्थ्यांना श्रमदान करताना आनंद मिळेल.त्यांच्या छोटया श्रमातून समाजाला व शाळांना मदत होईल. शाळा काही प्रमाणात स्वावलंबी बनतील (उदा. रयत –कमवा व शिका)असे नागरिक उदयाच्या भारताला महासत्ता बनवितील हे कार्य करून घेणारे प्रशिक्षणातून शिक्षक निर्माण झाले पाहिजेत गुरूकुल अभ्यासक्रमातील काही भाग घेता येईल.

**योगा शिक्षणाचा समावेश**

आजचे युग हे गतिमान आहे. सर्वांचीच धवपळ सुरू आहे. त्यामुळे आपणास योग्य समतोल आहार व व्यायाम मिळत नाही. एकीकडे भौतिक सुविधांची रेलचेल तर दुसरीकडे अस्वस्थ मानवी जीवन पाहावयास मिळते आहार पंतजली यांनी सांगितलेला योगा त्याचे महत्व शुध्द सात्विक समतोल आहार यांचे महत्व प्रशिक्षणार्थींना देणे आवश्यक आहे. म्हणून योगा शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात करणे आवश्यक आहे. हेच शिक्षक पुढे आपल्या विद्यार्थ्यांना त्याचे महत्व शिकवतील.

**स्पर्धा परिक्षाचे ज्ञान**

आजचे युग स्पर्धा परीक्षांचे आहे. डी.टी.ई. व बी.एड. विद्यार्थ्यांना ही प्रशिक्षणानंतर स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. प्राथमिक व माध्यमिक स्तरावर विविध स्पर्धा परिक्षांना विद्यार्थी बसतात तेव्हा त्यांची तयारी शिक्षकांनाच करावी लागते. यासाठी प्रशिक्षण कालवधीत स्पर्धा परीक्षांचे आयोजन,प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तयार करणे दृपरीक्षेत यश प्राप्त करता येईल आशा स्वरूपाचे मार्गदर्शन बदल करता येईल.

**पाश्चात्यांचे नवीन शैक्षणिक धोरण व भारतीय स्तरावर त्याची आवश्यकता**

आज जग हे एक खेडे तयार झाले आहे. जागतिक पातळीवर अनेक गोष्टीची देवाण –घेवाण होत आहे. शैक्षणिक क्षेत्रात ही नवनवीन विचार व प्रयोग यांचा अभ्यास करून भारतीय स्तरावर त्यातील कोणते प्रयोग व विचार उपयुक्त ठरतील यांचा अभ्यास करून ते विचार व कृती शिक्षक –प्रशिक्षणात

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आणता येतील. जे स्वीकारणे गरजेचे आहे त्यांचा स्वीकार करावा त्याच प्रमाणे भारतीय प्राचीन गुरूकुल शिक्षण प्रणालीतील चांगले आचार–विचार शैक्षणिक वातावरण शिक्षकांच्या सानिध्यात विद्यार्थ्यांची जडण –घडण होण्यासाठी प्रशिक्षणात अशा संस्थेने गुरूकुल वर्ग सूरू केली आहे त्यांचे ज्ञान प्रशिक्षणार्थीला होणे आवश्यक आहे.

## समारोप

आजच्या शिक्षण –प्रशिक्षणात विविध विषयांचा समावेश झालेला आहे. परंतु काही शैक्षणिक विचार, नवीन प्रवाह, प्रात्यक्षिक कार्ये यांचा समावेश होणे आवश्यक आहे. आजच्या प्रशिक्षणार्थी हा भविष्यात 30 ते 35 वर्षे या क्षेत्रात कार्यरत राहणार आहे. त्यासाठी भविष्यकाळाचा वेध घेऊन समक्ष शिक्षक–प्रशिक्षण देणे आवश्यक आहे केवळ जुने बदलून नवीन स्वीाकरणे हा दृष्टीकोन न ठेवता जे गरजेचे आहे त्याचा स्वीकार करून अभ्यासक्रमात तशा सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. तर बी. एड सारखे प्रशिक्षणामध्ये उशिरा होणारी प्रवेश प्रक्रिया व उपल्बध कालावधी यामध्ये हे प्रशिक्षण मोठी कसरत होत आहे. त्यासाठी हा प्रशिक्षण कालावधी दोन वर्षांचा होणे आवश्यक आहे. या स्तरावर कार्यरत आसणा–या प्राध्यापकांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी हे बदल घडवून आणणे आवश्यक आहे. अशा विविध सुधारणा शिक्षक –शिक्षणातील अभ्यासक्रमात करणे आवश्यक आहे.